तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २ अ/एडीएम/२०१६/९८७
दिनांक : 25 JUL 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

विषय : केंद्र शासनाने नामनिर्देशित केलेल्या (GOI Nominee Candidates) उमेदवारांच्या प्रवेशाबाबत....

संदर्भ : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली

संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमास देशातील विविध राज्यांमधील / केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवारांसाठी केंद्र शासनाच्या मानव संसाधन व विकास मंत्रालय,नवी दिल्ली यांचेकडून आरक्षित ठेवल्या जातात . या जागा संस्थेच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या ओव्हर अँड अबोव्ह असतात. केंद्र शासनाने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांसाठीची तरतूद शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील नियम क्रमांक ७(५)(d) मध्ये करण्यात आलेली आहे.

देशातील विविध राज्यांकडून/ केंद्रशासित प्रदेशांकडून त्यांना मंजूर असलेल्या कोटयानुसार उमेदवारांना थेट संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय प्रवेश ॲलॉट करण्यात येणार असून परिणामी सदर उमेदवार थेट संबंधित संस्थेकडे प्रवेश निश्चित करण्यासाठी हजर होतील. याअनुषंगाने खालील सूचना आपल्या अधिनस्त संस्थांना देण्यात याव्यात.

१. सदर उमेदवारांना संस्थांनी आवश्यक कागदपत्रे पडताळणी करून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मधील प्रवेश पात्रतेनुसार शैक्षणिक पात्रता धारण करीत आहे याची पडताळणी करून प्रवेश देण्यात यावा.
२. संस्थास्तरावरील प्रवेशासाठी उपयोगात आणण्यात येणारी कार्यपध्दती अनुसरावी मात्र हया उमेदवारांचे प्रवेश GOI Nominee या शीर्षाखाली अपलोड करण्यात यावेत.
३. जर उमेदवार संबंधित राज्यातील मागासवर्गीय असेल तर त्यास महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीयांप्रमाणे फक्त शैक्षणिक पात्रतेत सूट अनुज्ञेय आहे.

४. सदर उमेदवारांना वसतिगृहामध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात यावी.

५. केंद्र शासनाचे नामनिर्देशित केलेल्या जागा या संस्थेच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या ओव्हर अँड अबोव्ह असून सदर जागांवर प्रवेश दिलेल्या उमेदवारांकडून महाराष्ट्र शासनाने शासकीय संस्थेतील पदवी अभ्यासक्रमासाठी निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात यावेत. शासकीय संस्थेसाठी अभ्यासक्रमनिहाय शुल्क खालीलप्रमाणे आहे.

१. अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम ------

Tution Fee Rs.15000/-,Development Fee Rs.5000/-, Other Fee Rs.4000/- असे एकूण रुपये **24000/-**

२.औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम

Tution Fee Rs.8000/-,Development Fee Rs.6000/-, Other Fee Rs.2000/- असे एकूण रुपये **16000/-**

३. वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम

Tution Fee Rs.8000/-,Development Fee Rs.6000/-, Other Fee Rs.2000/- असे एकूण रुपये **16000/-**

या उमेदवारांकडून उपरोक्त नमूद शुल्काशिवाय कोणतेही जास्तीचे शुल्क आकारण्यात येऊ नये

६. केंद्र शासनाने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना अभ्यासक्रम बदल किंवा संस्था बदल करता येणार नाही ही बाब सदर उमेदवारांच्या निदर्शनास आणून दयावी व तशी नोंद संस्थेकडे ठेवण्यात यावी.

७. सदर उमेदवाराची आवश्यक मूळ प्रमाणपत्रे व कागदपत्रे शासनाच्या / संचालनालयाच्या विहीत नियमानुसार तपासून घेण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुखांवर असेल .

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई